**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि १६ सप्टेंबर २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५६०/२०२३ भादवि ३२६,३४१,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १५/०९/२०२३ रोजी २१.०० वा चे सुमारास, शेट्टी वस्ती मार्ग, मरीआई चौकापासुन नान्नजकर हॉस्पीटलच्या समोरील मार्ग रोड वर जात असताना, गोल्ड जिम जवळ,रोडवर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०९/२०२३ रोजी १२.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आदित्य जयवंत यमपुरे, वय- १९ वर्षे, रा. ७५, बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मृत्युंजय गवळी, २) अमित गवळी, ३) अश्विन साठे, रा. सोलापूर |
| **जखमीचे नाव** | : | फिर्यादी स्वत: व फिर्यादीचा मित्र पृथ्वीराज गायकवाड |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादीचा मित्र पृथ्वीराज गायकवाड असे दोघे मोटार सायकल वरुन घराकडे त्याला घरी सोडण्यासाठी जात असताना, वरील ठिकाणी आले असता, तेथे आरोपीत क्रं. १ हा थांबलेला फिर्यादीस दिसला तेव्हा फिर्यादी व फिर्यादीचा मित्र यांनी कानाडोळा करुन जात असताना त्यांनी फिर्यादीस हात करुन मोटार सायकल थांबविण्याचा इशारा केला तेव्हा काही तरी सांगावयाचे असावे असे समजुन फिर्यादीने मोटार सायकल थांबविले असता आरोपीत क्रं. १ हा फिर्यादीजवळ येवून फिर्यादीचा मित्र पृथ्वीराज याच्या अंगावर मारण्यासाठी धावून जावू लागला व त्याचे नातेवाईक आरोपीत क्र. २ व ३ हे तेथे आले. आरोपीत क्रं. ३ याने पृथ्वीराज यास हाताने चापट मारले तसेच आरोपीत क्रं. १ याने पृथ्वीराज गायकवाड यास मागील भांडणाचा राग मनात ठेवून त्यास मारण्यासाठी अंगावर धावुन त्याच्या जवळील धार-धार कोयत्याने डाव्या पायावर कमरेच्या खाली मांडीवर जोराने घाव घालुन जखमी केले. त्यावेळी पृथ्वीराज यास जखम झाले फिर्यादी त्यास सोडावयास गेले असता आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस सुध्दा त्याचेजवळील कोयत्याने फिर्यादीचे डाव्या हाताच्या पोटरीवर, दंडावर घाव घालुन मारुन जखमी केले. त्यावेळी तो कोयता डाव्या पायाच्या मांडीवर मार लागुन जखम झाली आहे म्हणुन फिर्यादीची वरील आरोपीतांविरुध्द कायदेशीर तक्रार आहे म्हणून. तपास:- सपोनि/ गायकवाड - **९९७००३३८४०** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६३१/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १३/०९/२०२३ रोजी १९.३० वा चे सुमारास, मोदी स्मशान भुमी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०९/२०२३ रोजी १४.३० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | नागराज भारत जाधव, वय- ३० वर्षे, रा. भैरु वस्ती, लिमयेवाडी, सचिन तळभंडारेचे घराजवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | दोन अनोळखी इसम |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे भैरु वस्ती येथे बाथरुमचे काम चालु असल्याने बांधकामासाठी कामगार पाहण्याकरीता वरील ठिकाणी गेले असता, तेथे दारु पित बसलेल्या दोन इसमांवर फिर्यादीचे मोटार सायकलचे हेडलाईटचे फोकस पडल्याने वरील दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीस डोळयावर ठोशाने मारुन व लाथाबुक्याने मारुन, छातीवर पायाने जोरात मारुन व डोकीस दगडाने मारुन जखमी करुन गेले आहेत म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ४२१ इनामदार- ८६०५०१०१४१ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५५८/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ११/०९/२०२३ रोजी २०.०० वा ते दि. १२/०९/२०२३ रोजी रात्री ०३.०० वा चे दरम्यान, सोलापूर पुणे हायवे रोडलगत, काकासाहेब पाटील यांच्या घरासमोर, सार्वजनिक रोडवर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०९/२०२३ रोजी ०२.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | महादेव नागनाथ माळगे, वय- ३१ वर्षे, रा. मु.पो केगाव, मारुती मंदिराजवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १) ३६,०००/- रु बल्कर गाडीचे एकुण ४ टायर प्रत्येकी ९,०००/- रु किंमतीचे<br>२) ५,५२०/- रु ६० लिटर डिझेल<br>एकुण- ४१,५२०/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची टाटा कंपनीची १६ टायर बल्कर क्रं. एम एच १२ व्ही एफ ७३५२ ही गाडी वरील ठिकाणी लॉक करुन पार्क करुन झोपण्यासाठी फिर्यादीच्या घरी गेले असता, अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चार टायर व ६० लिटर डिझेल चोरुन नेले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ८३७ पवार - |